Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 16TH DECEMBER 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

खालीं दिलेला आक्टाचा मसुदा, त्यासोबतच्या हेतु व कारणें यांच्या निरूपणासहित, मुंबईचे आलीजा बहादुर गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाच्या सभांचें काम चालविण्याबाबदच्या कानूंपैकीं २२ व्या कानूस अनुसरून, प्रसिद्ध केला आहे:—

### सन १८९७ चा मसुदा ३.

### सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थीं यांत खालीं सांगितलेल्या रीतीनें सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारणें योग्य आहे; त्याअर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट, ज्यास यांत पुढें सदर्हू आक्ट असें ह्मटलें आहे, त्याच्या १ ल्या कलमाच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— १ ल्या कलमाची सुधारणूक.

"१. (१) या आक्टास सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट असें ह्मणावें. लहान सरनामा.

(२) तो, मुंबई शहर, सिंध व एडन हीं शिवायकरून सगळ्या मुंबई इलाक्यास लागू आहे, परंतु गव्हर्नर इन् कौन्सिल हे कोणत्याहि वेळीं, मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून तो किंवा त्याचा कोणताहि भाग सिंध किंवा एडन यास लागू करण्यास मुखत्यार आहेत." व्याप्ति.

२. सदर्हू आक्टाच्या २ ऱ्या कलमांत "पोट-कलम (१)" या शब्दांबदल व आंकड्याबदल "पोट-कलम (२)" हा मजकूर दाखल करावा. २ ऱ्या कलमाची सुधारणूक.

३. सदर्हू आक्टाचें कलम २५, पोट-कलम (२) याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— कलम २५, पोट-कलम २, याची सुधारणूक.

"(२) अशा जादा पोलिसाचा खर्च, गव्हर्नर इन् कौन्सिल तसें फर्मावितील तर, सर्वांशीं किंवा अंशतः, यांत खालीं सांगितलेल्या सर्व किंवा कोणत्याहि मनुष्यांवर पट्टी

बसवून, अगर रहिवाशांच्या मालमत्तेच्या उत्पन्नाप्रमाणें किंवा किंमतीप्रमाणें त्या मालमत्तेवर कर आकारून, व ती पट्टी किंवा तो कर—

(अ) साधारणतः, जे मनुष्य

(१) तो जाहिरनामा ज्या प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशांतील रहिवाशी असतील, किंवा

(२) स्वतः अशा प्रदेशांतील रहिवाशी असले किंवा नसले तथापि, सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा याच्या अर्थाप्रमाणें अशा प्रदेशांतील कोणतीहि जमीन धारण करणारे असतील किंवा इतर प्रकारें तींत ज्यांचा हितसंबंध असेल, तशा सर्व मनुष्यांवर बसवून,

(ब) किंवा अशा मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्यांवर अगर अशा मनुष्यांच्या कोणत्याहि विशिष्ट भागावर किंवा भागांवर अथवा वर्गावर किंवा वर्गांवर विशेष प्रकारें बसवून,

भागविला पाहिजे, आणि अशी पट्टी किंवा कर हीं कोणत्या प्रमाणांनीं बसवावीं, तें फर्मावण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे."

२५ व्या कलमांत नवीन पोट-कलम (३) दाखल करणें.

४. सदहू आक्टाचें कलम २६, पोट-कलम (२) याच्या नंतर खालीं सांगितलेलें नवीन पोट-कलम दाखल करावें व त्यास (३) हा नंबर द्यावा, ह्मणजे:—

"(३) अशी पट्टी किंवा कर देण्याची मुदत, असें जादा पोलीस ज्या मुदतीपर्यंत खरोखर ठेविलें असेल त्या मुदतीबाहेर वाढविण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे."

कलम २५, पोट-कलम (३) याचा सुधारणूक.

५. सदहू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या हल्लींच्या (३) ऱ्या पोट-कलमास (४) हा नंबर द्यावा आणि त्यांत "सदहू प्रकारचा कर कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें आकारला पाहिजे" या शब्दांच्या ऐवजीं खालील शब्द दाखल करावे, ह्मणजे:—

"कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें सदहू पट्टी बसविली पाहिजे किंवा सदहू कर आकारला पाहिजे."

२५ व्या कलमांत नवीन (५) वें पोट-कलम दाखल करणें.

६. सदहू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या नवीन (४) थ्या पोट-कलमानंतर खालीं दिलेलें नवीन पोट-कलम दाखल करावें, ह्मणजे:—

"(५) वर सांगितलेल्या प्रकारच्या मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्यांस किंवा त्यांच्या कोणत्याहि वर्गास किंवा भागास, अशा खर्चाचा कोणताहि भाग सोसण्याच्या पात्रतेंतून, हुकुम करून, वगळण्यास गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे."

नवीन कलम दाखल करणें.

७. सदहू आक्टाच्या २९ व्या कलमानंतर खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें, ह्मणजे:—

गैरकायद्याच्या मंडळीनें केलेल्या नुकसानीचा मोबदला कसा वसूल करावा.

"२९. अ. (१) जिल्हा माजिस्ट्रेट हा—

(अ) त्यास जरूर वाटेल ती चौकशी केल्यानंतर,

(१) एकाद्या गैरकायदेशीर मंडळीचा सामान्य हेतु शेवटास नेण्याच्या कामीं केलेल्या कोणत्याहि कृत्यामुळें, कोणत्याहि मालमत्तेस झालेल्या तोट्याच्या किंवा खराबीच्या संबंधानें, अगर कोणत्याहि मनुष्यास किंवा मनुष्यांस आलेल्या मरणाच्या किंवा झालेल्या

मोठ्या दुखापतीच्या संबंधानें, कोणत्याहि मनुष्यास किंवा मनुष्यांस नुकसानीचा मोबदला ह्मणून किती रकम द्यावी असें त्याला वाटेल ती रकम ठरविण्यास, आणि

(२) ज्या कोणत्या प्रदेशांतील रहिवाशांनीं आपल्या वर्तनाच्या योगानें अशी मंडळी भरली आहे किंवा भरण्याच्या कामीं मदत केली आहे असें त्यास वाटेल, तो प्रदेश ठरविण्यास मुखत्यार आहे;

(ब) सदर्हूप्रमाणें ठरविलेली रकम, जे मनुष्य

(१) सदर्हूप्रमाणें ठरविलेल्या प्रदेशांतील रहिवाशी असतील, किंवा

(२) स्वतः अशा प्रदेशांतील रहिवाशी असले किंवा नसले तथापि, सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा याच्या अर्थाप्रमाणें अशा प्रदेशांतील कोणतीहि जमीन धारण करणारे असतील किंवा इतर प्रकारें तींत ज्यांचा हितसंबंध असेल,

तशा सर्व किंवा कोणत्याहि मनुष्यांपासून अगर तशा मनुष्यांच्या कोणत्याहि भागापासून किंवा भागांपासून अथवा वर्गापासून किंवा वर्गांपासून, गव्हर्नर इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन जिल्हा माजिस्ट्रेट फर्मावील त्या प्रमाणांनीं, वसूल करण्याविषयीं, तशीच मंजुरी घेऊन, कलेक्टरास सांगण्यास मुखत्यार आहे;

(क) असा प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें पट्टी बसवून किंवा कर बसवून अशी रकम आकारण्याविषयीं व वसूल करण्याविषयीं म्युनिसिपालिटीस सांगण्यास मुखत्यार आहे; आणि ती पट्टी किंवा तो कर म्युनिसिपालिटीनें, सदर्हू हुकुमांस अनुसरून फर्माविलेल्या प्रमाणांनीं अशा मनुष्यांवर बसवून त्यांजपासून वसूल केला पाहिजे; आणि

(ड) याप्रमाणें वसूल केलेला सर्व किंवा कोणताहि पैसा सदरीं सांगितल्या प्रकारच्या तोट्याच्या किंवा खराबीच्या अगर मरणाच्या किंवा मोठ्या दुखापतीच्या संबंधानें ज्या कोणत्याहि मनुष्यास किंवा ज्या कोणत्याहि मनुष्यांस नुकसानीचा मोबदला मिळण्याचा हक्क आहे असें जिल्हा माजिस्ट्रेटास वाटेल त्या मनुष्यास देण्याविषयीं किंवा त्या सर्व अगर कोणत्याहि मनुष्यांना वांटून देण्याविषयीं प्रसंगाप्रमाणें कलेक्टरास किंवा म्युनिसिपालिटीस सांगण्यास मुखत्यार आहे.

(२) अशा नुकसानीच्या मोबदल्याचा कोणताहि भाग देण्याच्या पात्रतेंतून वर सांगितल्या प्रकारच्या मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्यांस किंवा त्यांच्या कोणत्याहि भागास अथवा वर्गास हुकुम करून, वगळण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे.

(३) पोट-कलम (१) अन्वयें जिल्हा-माजिस्ट्रेटानें केलेला प्रत्येक ठराव, आकार, व हुकुम हे, गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडून किंवा या बाबतींत ते वेळोवेळीं ज्या अमलदारास अधिकार देतील त्या अमलदाराकडून तपासले जाण्यास पात्र असतील, परंतु याप्रमाणें खेरीज करून इतर प्रकारें ते अखेरचे असतील असें समजावें."

८. (१) सदर्हू आक्टाच्या २६ व्या कलमाच्या (१) ल्या पोट कलमांत,— २६ व्या कलमाची सुधारणूक.

(अ) "गेल्या शेवटल्या कलमाखालीं" या शब्दांच्या ऐवजीं "गेल्या शेवटल्या दोन कलमांअन्वयें" हे शब्द दाखल करावे;

(ब) " आकारलेला प्रत्येक कर " व " तो कर द्यावयास" या शब्दांच्या ऐवजीं अनुक्रमें " बसविलेली प्रत्येक पट्टी किंवा आकारलेला प्रत्येक कर " व " ती पट्टी किंवा तो कर " हे शब्द दाखल करावे.

(क) सदर्हू पोट कलम ( १ ) याच्या शेवटीं खालीं लिहिलेला मजकूर ज्यास्त वाढवावा, ह्मणजेः—

" मात्र हमेश असें ठरविलें आहे कीं अशा पट्टीची किंवा कराची वसुली न झाल्यास, ती पट्टी आपणच बसविली होती किंवा तो कर आपणच आकारला होता असें समजून ती पट्टी किंवा तो कर खालील पोट-कलमांत ठरविलेल्या रीतीनें कलेक्टरानें वसूल करावा असें फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे. "

( २ ) त्याच कलमाच्या ( २ ) ऱ्या पोट-कलमांत,—

(अ) " आकारलेला प्रत्येक कर, तो देण्यास " या शब्दांच्या ऐवजीं " बसविलेली प्रत्येक पट्टी किंवा आकारलेला प्रत्येक कर किंवा वसूल करावयाची प्रत्येक रकम हीं, तीं देण्यास " हे शब्द दाखल करावे.

(ब) " वसूल केला पाहिजे" या शब्दांच्या ऐवजीं " वसूल केलीं पाहिजेत" हे शब्द दाखल करावे.

९ सदर्हू आक्टाच्या २६ व्या कलमानंतर खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें, ह्मणजेः—

गेलीं तीन कलमें सिंधप्रांतांत लागू केल्याचा परिणाम.

" २६ अ. सदरील शेवटलीं तीन कलमें सिंध प्रांतांत अमलांत आल्यावर, सन १८६७ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट याच्या १६ व्या व १७ व्या कलमांतील ठराव जेवढ्या अंशीं सदर्हू कलमांशीं जुळत नसतील तेवढ्या अंशीं ते त्या प्रांतांत रद्द झाले आहेत असें मानलें पाहिजे."

४२ व्या कलमाची सुधारणूक.

१०. सदर्हू आक्टाच्या ४२ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमांत, "गाणीं गाणें" या शब्दांच्या नंतर खालील मजकूर दाखल करावा ह्मणजे :—

"वाद्यें वाजविणें."

४८ व्या कलमाची सुधारणूक.

११. सदर्हू आक्टाच्या ४८ व्या कलमाचें पोट कलम (१), रकम (अ), यांत " जाणाऱ्या मंडळ्यांच्या, मिरवणुकींच्या आणि जमून जाणाऱ्या लोकांच्या अगर मेळ्यांच्या वर्तनाविषयीं" या शब्दांच्या ऐवजीं " जाणाऱ्या मंडळ्या, मिरवणुकी, आणि जमून जाणारे समुदाय अगर मेळे यांतील मनुष्यांच्या वर्तनाविषयीं आणि वागणुकीविषयीं किंवा कृत्याविषयीं" हे शब्द दाखल करावे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

या मसुद्याच्या १ ल्या कलमावरून सन १८९० च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट पोलीस आक्टाच्या १ ल्या कलमांत जो फेरफार करण्याचें योजिलें आहे तो केवळ पारिभाषिक आहे.

२. सन १८९० च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट पोलीस आक्टाचें १ लें कलम पुनः रचल्यामुळें, या मसुद्याच्या २ ऱ्या कलमांत योजिल्याप्रमाणें त्या आक्टाचें २ रें कलम सुधारणें जरूर आहे.

३. सन १८९० च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट पोलीस आक्टाच्या २९ व्या कलमाअन्वयें झटलें ह्मणजे, ज्या कोणत्याहि प्रदेशांत अस्वस्थता अगर भय उत्पन्न झाल्याचें दिसत असेल त्या प्रदेशांत ठेवावयाच्या जादा पोलिसाचा खर्च त्या प्रदेशांतील राहिवाशांवर किंवा तशा राहिवाशांच्या एकाद्या विशिष्ट भागावर घालण्याचा अधिकार आहे. या मसुद्याच्या ३ ऱ्या कलमावरून ही पात्रता, अशा प्रदेशांतील जमीन धारण करणारे स्वतः इतर कोणत्याहि ठिकाणीं राहत

असले तथापि त्यांनाहि लागू करण्याचें योजिलें आहे. जमीनमिळकतीच्या मालकाच्या योगानें प्राप्त झालेलें तिच्या मालकाचें वजन आणि अशा मिळकतीचें सरकारांतून होणारें संरक्षण यांकडे लक्ष दिलें ह्मणजे, सदर्हू प्रकारचे जमीन धारण करणारे अस्वास्थ्य प्राप्त झालेल्या प्रदेशांतील रहिवाशी असले किंवा नसले तथापि त्यांजवर लोकांचा स्वस्थपणा राखण्याच्या जबाबदारीचा योग्य भाग पडावा हें अगदी वाजवी आहे. सदर्हू कलमाच्या मसुद्यावरून, जादा पोलिसाचा खर्च कसा भागवावा त्याबाबदचा ठरावहि ज्यास्त स्पष्ट होईल.

४. इंग्लंडच्या कायद्याप्रमाणें, सदर्हू आक्टाचें कलम २९ रकम (२) यांतील "रहिवाशांवर कर बसवून" या शब्दांचा अर्थ "रहिवाशांच्या मालमत्तेवर, त्या मालमत्तेच्या उत्पन्नाच्या किंवा किंमतीच्या मानानें कर आकारून" असा होतो. ह्मणजे जेव्हां एकादा मनुष्य, कोणत्याहि मालमत्तेचा तो मालक असल्याच्या, किंवा ती त्याच्या कबज्यांत असल्याच्या कारणानें, कर देण्यास पात्र असतो तेव्हां तो करास पात्र आहे असें ह्मणण्यांत येतें. "रहिवाशांवर कर बसवून" या संक्षिप्त वाक्याच्या योगानें जर कांहीं संशय उत्पन्न होण्यासारखा असेल तर तो दूर करून सदर्हू शब्दांचा वाजवी व कायदेशीर अर्थ देण्यासाठीं ह्मणून या मसुद्याच्या ३ ऱ्या कलमांत मजकूर वाढवून तें कलम सुधारलें आहे. तसेंच, जादा पोलिसाच्या खर्चास वर्गणी देण्यास इतर प्रकारें जबाबदार असलेला मनुष्य, कर देण्यास पात्र असलेली कोणतीच मालमत्ता त्याजवळ नाहीं एवढ्याच केवळ कारणामुळें, अशा जबाबदारींतून सुटणार नाहीं हें स्पष्ट करण्यासाठीं, जरूर असलेल्या प्रत्येक ठिकाणीं "कर" या शब्दाबरोबर आणखी "पट्टी" हा वैकल्पिक शब्द दाखल केला आहे.

५. जादा पोलिसाचा खर्च देण्याची मुदत, तें पोलीस खरोखर जेवढा काळपर्यंत ठेविलें असेल त्या काळापेक्षां वाढवून जास्त करण्याची सरकारची इच्छा असल्यास त्यास तसें करण्याचा अधिकार विद्यमान कायद्यावरून येईल असें दिसतें. असा खर्च बसविलेल्या मनुष्यांना त्या खर्चाची रकम भरण्याची मुदत वाढवून दिल्यास कित्येक बाबतींत परिणाम चांगला होईल असें दिसतें. यास्तव या विषयासंबंधीं सर्व संशय दूर करण्यासाठीं, सरकारास हा अधिकार आहे असें स्पष्टपणें ठरविण्याचें या मसुद्याच्या ४ थ्या कलमांत योजिलें आहे.

६. जादा पोलिसाच्या खर्चासाठीं बसविलेल्या करासंबंधी कोणत्याहि प्रकारच्या पात्रतेंतून, इतर प्रकारें पात्र असलेल्या विशिष्ट मनुष्यांस वगळण्याचा सरकारास सन १८९५ च्या ८ व्या आक्टावरून सुधारलेला सन १८६१ चा (पोलिसाचें नियमन करण्याबाबदचा) आक्ट ५, याचें कलम १५ (५) याच्या धरतीवर अधिकार देण्याचें या मसुद्याच्या ६ व्या कलमांत योजिलें आहे.

तोटा किंवा खराबी झाल्याबद्दल नुकसानीच्या मोबदल्याचा कोणताहि भाग देण्याच्या पात्रतेंतून विशिष्ट मनुष्यांस वगळण्याच्या संबंधानें तसाच एक ठराव या मसुद्याच्या ७ व्या कलमांतील नवीन कलम २९ अ याच्या (२) ऱ्या पोट-कलमावरून सदर्हू आक्टांत दाखल केला आहे. (सुधारलेला सन १८६१ चा आक्ट ५ याचें कलम १५ अ (३) ताडून पहा.)

७. कोणत्याहि प्रदेशांतील रहिवाशांच्या वर्तनामुळें एकत्र जमलेल्या गैरकायदेशीर मंडळीचा सामान्य हेतु शेवटास नेण्याच्या कामीं करण्यांत आलेल्या कोणत्याहि कृत्याच्या कारणानें झालेल्या तोट्याबद्दल किंवा खराबीबद्दल नुकसानीचा मोबदला त्या प्रदेशांतील जमीन धारण करणारांपासून व रहिवाशांपासून वसूल करण्याविषयीं गव्हर्नर इन् कौन्सिल यांची मंजुरी घेऊन फर्माविण्याचा अधिकार जिल्हा-माजिस्ट्रेटास देण्यासाठीं सदर्हू आक्टांत एक नवीन कलम जास्त दाखल करण्याचें या मसुद्याच्या ७ व्या कलमांत योजिलें आहे. सदर्हू कलमाचा जो मसुदा केला आहे त्यावरून, म्युनिसिपल डिस्ट्रिक्टाच्या बाबतींत गव्हर्नर इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन जिल्हा माजिस्ट्रेट फर्मावील तशा मनुष्यांपासून व तशा प्रमाणांनीं नुकसानीचा मोबदला वसूल करण्याविषयीं म्युनिसिपालिटीस सांगणें हें त्या माजिस्ट्रेटाच्या नजरेवर राहील.

नवीन कलम २९ अ, पोटकलम (३) यावरून, त्याअन्वयें जिल्हा-माजिस्ट्रेट जीं कामें चालवील तीं सर्व गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडून किंवा या बाबतींत ते वेळोवेळीं ज्या अमलदारास अधिकार देतील त्या अमलदाराकडून तदेसलीं जाण्यास पात्र होतील.

८. ८ व्या कलमाचीं पोट-कलमें (१) (ब) व (२) आणि तसेंच कलम ९ यांत, या मसुद्याच्या पहिल्या तीन कलमांतील फेरफारांमुळें सदर्हू आक्टांत ज्या कित्येक सुधारणुकी करणें जरूर झालें आहे त्या सुधारणुकी करण्याबाबदचे ठराव आहेत. ८ व्या कलमाचें पोट-कलम (१) (क) हें म्युनिसिपल क्षेत्रांतील जादा पोलिसाच्या खर्चाच्या वसुलीसंबंधी आहे. जादा पोलिसाचा खर्च ज्या प्रदेशांत वसूल करावयाचा तो प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्टाबाहेरील प्रदेश असेल तेव्हां, कलेक्टरानें जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें कर वसूल केला पाहिजे असें सदर्हू आक्टाचें

कलम २६ (२) यांत ठरविलें आहे. दुसऱ्या पक्षीं, असा प्रदेश हा म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असेल तर, कर वसूल करणें तो, "त्याजबद्दल जबाबदार असलेल्या प्रत्येक मनुष्यापासून त्या डिस्ट्रिक्टच्या म्युनिसिपालिटीनें, त्याजकडे येणें झालेल्या म्युनिसिपल पट्टीप्रमाणें वसूल केला पाहिजे" असा सदर्हू आक्टाचें कलम २६ (१) यांत ठराव केला आहे. ह्मणजे असा कर, म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांत, तो न देणाऱ्या मनुष्यापासून त्याच्या जंगम मालमत्तेच्या संबंधानें फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याच्या ३८६ व्या व ३८७ व्या कलमांअन्वयें (सन १८७३ चा मुंबईचा आक्ट ६, कलम ८४ ताडून पहा), किंवा त्याच्या स्थावर मिळकतीच्या संबंधानें दिवाणींत दावा करून वसूल करण्याजोगा आहे. म्युनिसिपल क्षेत्र नसलेल्या प्रदेशांत ज्या रीतीनें कर वसूल करण्याची कलेक्टरास परवानगी दिली आहे ती रीति ज्यास्त जलदीची व सोयस्कर आहे. यास्तव म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांतलेहि त्याच प्रकारचे कर वसूल करण्याचें काम तितकेंच सुसाध्य व्हावें ह्मणून, असा कर म्युनिसिपालिटीस वसूल न झाल्यास तो, जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें, वसूल करण्याविषयीं कलेक्टरास फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे, असा या मसुद्याचें कलम ८ (१) (क) यांत ठराव करण्याचें योजिलें आहे.

९. सदर्हू आक्टाच्या ४२ व्या कलमाचें पोट-कलम (१) यावरून, माजिस्ट्रेटास "जरूर दिसेल त्या वेळीं व तितकावेळपर्यंत" सार्वजनिक शांतता मोडण्यासारख्या कृत्यांस मनाई करण्यासाठीं किरकोळ हुकुम करण्याचा अधिकार दिला आहे. सदर्हू पोट-कलमावरून, सार्वजनिक रीतीनें आरोळ्या मारण्याची व गाणीं गाण्याची मनाई केली आहे. निकडीचा प्रसंग खरोखर घडून आल्यास त्या वेळीं सदर्हू आक्टाच्या ४४ व्या कलमाअन्वयें, वाद्यें वाजविण्याच्या गोष्टीचा निकाल करतां येईल अशाबद्दल कांहींच शंका घेण्यांत आलशी नाहीं. तथापि, सदर्हू पोट-कलमांतील ठराव जेणेंकरून "वाद्यें वाजविण्याच्या गोष्टीस" स्पष्टपणें लागू होतील असे शब्द दाखल करणें इष्ट वाटलें आहे. लोकांचा स्वस्थपणा राखण्यासाठीं, गाण्याच्या संबंधानें हुकुम करण्यासारखा कोणताहि विशेष निकडीचा प्रसंग नसेल अशा वेळीं देखील कधीं कधीं तशा प्रकारचे जरूरीचे हुकुम करणें इष्ट दिसतें; यास्तव, सार्वजनिक रीतीनें आरोळ्या मारण्याच्या व गाणीं गाण्याच्या संबंधानें माजिस्ट्रेटास ४२ व्या कलमावरून जो अधिकार दिलेला आहे तोच अधिकार वाद्यें वाजविण्याच्या संबंधानें त्यास स्पष्टपणें देण्याचें या मसुद्याच्या १० व्या कलमांत योजिलें आहे.

१०. या मसुद्याच्या ११ व्या कलमांत, सदर्हू आक्टाच्या ४८ व्या कलमाची जी सुधारणूक करण्याचें योजिलें आहे ती करणें जरूर आहे असें, राणी सरकार विरुद्ध हुकुमपुरी बळवा गोसावी व इतर या खटल्यांत हैकोर्टानें केलेला निकाल, तारीख १० आगस्ट, सन १८९६, यावरून दिसून आलें आहे.

(सही) ई. सी. के. आलिव्हंट.

मुक्काम मुंबई, तारीख २३ माहे नवंबर, सन १८९७.

आलीजा धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) एस्. एल्. ब्याचेलर,

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

मुक्काम मुंबई, तारीख २४ माहे नवंबर, सन १८९७.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.